भारत सरकारचे नवीन शैक्षणिक धोरण

गौरांग

प्रास्ताविक :— आपल्या सभोवार पसरलेल्या चराचर सृष्टीमध्ये असणा—या कुतूहलांचा वेध घेऊन त्याचे वास्तविक रूप कार्यकारणभावाच्या शास्त्रीय प्रमाणकांनी सिध्द करताना त्या अफाट ऊर्जेचा व वस्तू विचारांचा मानवी कल्याणासाठी वापर करण्याच्या पध्दतीला 'ज्ञान पध्दती' म्हटले जाते. ही ज्ञान पध्दती मोठी क्रांतीकारी व दूरगामी परिणाम घडविणारी असते, तरी ती खुप संवेदनशील असून सामाजिक पर्यावरणातील शासन व समाज, प्रशासन व धोरण, शिक्षक व विद्यार्थी तथा पालक यांच्या सूक्ष्म हालचालींचा तिच्यावर तरल तरी सखोल परिणाम होत असतो. विशेषतः 1991 च्या जागतिकीकरण व खाजगीकरणाने शिक्षणव्यवस्था आमूलाग्र बदलली. या अंगभूत बदलांना उत्तर आधुनिकवादी विचार कारणीभूत ठरल्याने सर्व शिक्षणसंस्था व्यापारी बाजारपेठा झाल्या, तर शिक्षक हा विक्रेता व विद्यार्थी हा ग्राहक बनला. देशाचे राजकारण, समाजकारण व अंदाजपत्रकीय आर्थिक नियोजनाचा जेवढा विचार या काळात व नेहमीच बहुजनसमाजात होतो. तेवढा गंभीर विचार या बदलणा—या शिक्षणप्रवाहाचा कधीच कोणी करत नाही कारण इतर आर्थिक तेजी मंदीचे थेट परीणाम लगेच लोकांच्या खिश्यावर परिणाम करतात, तसे दृश्य व थेट परिणाम शिक्षण बदलातून होत नाहीत, असा गैरसमज सार्वत्रीक असतो आणि तो समज गैरसमज अर्थातच फसवा असतो. या जागतिकीकरणाने मानवीजीवनाचे सर्व संदर्भ व अर्थ बदलले आणि स्पर्धेच्या धावपळीला महत्व आले. यात 1986 च्या शैक्षणिक धोरणाची मोठी कोंडी झाली. वास्तविक पहाता 1991 ची नवी राष्ट्रीय शैक्षणिक आव्हाने दूर करण्यास या समकाळात सक्षम आधुनिक नवे शैक्षणिक धोरण जाहीर होणे गरजेचे होते पण तसे गांभीर्य त्यावेळी कोणाला वाटले नाही. मूळात शिक्षण हे अनुत्पादक मानल्याने शिक्षणाला राष्ट्रीय व राज्यस्तरावरही कधी न्याय मिळत नाही किंवा कार्यक्षम शिक्षणतज्ञ व्यक्तीकडे ते खातेही जात नाही. हे खरे आपले दुर्दैव आहे.

तर 1986 नंतर राष्ट्रीय नवे शैक्षणिक धोरण हे 29 जुलै 2020 रोजी संसदेत मंजूर झाले. ते शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधानजी यांनी मांडले होते. या धोरणात शालेय अभ्यासक्रमात कृत्रीम बुध्दिमत्ता, आर्थिक बाबी, व मातृभाषांवर भर दिला होता. तसेच भारताला जागतिक ज्ञानसत्ता बनवण्याचे ध्येय्य प्रमाणित करण्यात आले होते. ज्यात या धोरण कमिटीचे अध्यक्ष महान शास्त्रज्ञ के. कस्तुरीरंगन यांचा हेतू विशुध्द होता. या धोरणातील मूलभूत ध्येय्य व संकल्पना यांचे परिक्षण केल्यावर नंतर नव्या धोरणाचा रचनात्मक आकृतीबंध तपासता येईल. प्रथमतः या संकल्पना तपासून पाहू. त्या पुढील प्रमाणे —

(1) कृत्रिम बुध्दिमत्ता व आर्थिक बाबी :— या नव्या शैक्षणिक धोरणात कृत्रीम बुध्दिमत्ता म्हणजे संगणकीय तंत्रज्ञान व इंटरनेट शिक्षणाला दिलेले महत्व होय. जे आर्थिक विषमतेचा आणि पायाभूत संगणकीय सेवासुविधांचा विचार न करता ठरवलेले धोरण आहे. कारण याच अहवालात 2025 पर्यंत त्याची पूर्तता करण्याची हमी दिलेली दिसते. कृत्रीम बुध्दिमत्तेचा विकास करताना जसा दारिद्रयरेषेखालील व ग्रामीण डोंगराळ भागातील विद्यार्थ्यांचा विचार झालेला नाही, तसा हा तांत्रिक अतिरेकी वाढीचा विद्यार्थ्यांच्या सर्जनशीलतेवर व उपक्रमशीलतेवर तथा अभिजात बौध्दिक वाढीवर प्रतिकुल परिणाम होणार आहे, याकडेही दुर्लक्ष झालेले दिसते. संगणक, इंटरनेट व मोबाईल हे व्यापक व वेगवान ज्ञानसंकलनाचे मार्ग आहेत पण त्यांचा शिक्षणापेक्षा टिवटरवार, फेक न्युज, आणि सायबर गुन्हयासाठी अधिक वापर होत आहे. त्यामुळे वाचनलेखन संस्कृती नष्ट होत असून कला, साहित्य यासारखे माणूस घडविणारे शिक्षणप्रकार मागे पडत आहेत म्हणून कृत्रीम बुध्दिमत्ता ही नैसर्गिक बुध्दीला पूरक व सहाय्यकारी असावी मात्र तिने मानवी बुध्दी व

भावनावर अतिक्रमण करू नये. सध्या संगणकीय प्रशासन व्यवस्थेने कामाचा दिखावू वेग वाढला असला तरी कार्यालयीन सर्व्हर डाऊन गोंधळ व दप्तरदिरंगाई वाढलेली आहे. हे परावलंबन धोकादायक आहे.

(2) मातृभाषा व प्रादेशिक भाषेत दिले जाणारे शिक्षण :– 1968 मध्ये तत्कालीन प्रधानमंत्री इंदिरा गांधींनी 10+2+3 या शैक्षणिक आराखडयाचा स्वीकार करताना मातृभाषा, राष्ट्रभाषा व इंग्रजी असे त्रिभाषासूत्र मान्य केले होते. कोठारी आयोगाच्या 1964 च्या या शिफारसी होत्या. भाषा हे ज्ञानप्राप्तीचे मुख्य साधन असते, मात्र भारतात हिंदी राष्ट्रभाषा असावी की नसावी? यावर उत्तर भारत विरूध्द दक्षिण भारत असा मोठा वाद संसदेत पूर्वी गाजला होता. बहुभाषिक भारतात शिक्षण कोणत्या भाषेत दयावे, हा तेव्हा तसा प्रश्नच होता. विनाअनुदानित शाळांना महाराष्ट्रात परवानगी मिळाल्यानंतर साखर सम्राट हे इंग्रजी माध्यमाच्या शाळानिर्मितीत अडकले. तेंव्हापासून सरकारी शाळा प्रादेशिक भाषेत व दुय्यम भाषा म्हणून इंग्रजी, संस्कृतवर चालू लागल्या. राष्ट्रभाषा म्हणून हिंदीला त्यांना स्वीकारावे लागले असले तरी ती दक्षिण भारतात उपेक्षीत ठरली. तिच्या प्रचारासाठी राष्ट्रीयकृत बँकात 'हिंदीमें बातचित कीजिए' अशा प्रचाराची वेळ सरकारवर आली. मात्र या काळात अती गुणवत्तेच्या मागे लागलेल्या पालकांनी मुलांना पैशाच्या जोरावर खाजगी इंग्रजी शाळात दाखल करून घरादारात मराठी व शाळेत इंग्रजी असा धेडगुजरी प्रयोग सुरू केला. त्याचा परिणाम सध्या सर्वत्र दिसत असून मराठीला अभिजात भाषेचा दर्जा द्या, ही मागणी करण्याची वेळ लेखक व भाषा अभ्यासकावर आली आहे. सध्याचे संसदीय भाषिक कामकाज, प्रेसमीडियाचे भाषिक कामकाज, मोबाईल कमेंट, सरकारी बोर्ड, नोकरीचे लिखित अर्ज व त्यासाठीच्या पाकीटावरचे पत्ते तपासून पाहिले तर कम्प्युटरच्या भाडोत्री मेंदूकाळात व मातृभाषेवरील दुर्लक्षाने आपली भाषिक किती मोठी हानी झाली आहे, हे लक्षात येते. खाजगी इंग्रजी शाळा व ॲडव्हान्स क्लासेस ही प्रस्थापितांची व्यवस्था असल्याने त्यावर नियंत्रण दिसत नाही, यातून याच लोकांनी इंजिनियरींग कॉलेजेसचा सुळसुळाट करून बेकारांची संख्या वाढवत आता त्याच कॉलेजमध्ये व्यापारी मॉल्स, मंगल कार्यालये सुरू केली आहेत. या सा–या भाषिक धरसोडीवर वेळीच लक्ष न दिल्याने ज्ञानसाधनेतील भाषा हा महत्वाचा संसूचन व संवादाचा आधारच भारतीय शिक्षणपध्दतीत हरवलेला आहे. मुलांना मातृभाषाच व्यवस्थित येत नसल्याने त्याला इंग्रजीसारख्या जागतिक भाषाही निट समजत नाहीत. खरतर मातृभाषा व प्रादेशिक भाषांना या नव्या धोरणात दिलेले महत्व स्तुत्य असले तरी बिघडलेल्या भाषिक व्यवस्थेला ते लवकर सांभाळू शकणार नाही, तसेच ते सध्या तरी व्यवहार्य नाही. भारतात अडीच हजार भाषा मातृभाषा किंवा स्थानिक भाषा आहेत. यात मराठीबरोबर संस्कृत, पारिया, मलबारी, पाली, अर्धमागधी जगन्नाथी, पहाडी, ऊर्दू व दाक्षिणात्य अशा अनेक भाषा आहेत. राष्ट्रीय स्तरावर शिक्षणाचा दर्जा समान राखण्यासाठी या सर्व स्थानिक भाषांमध्ये दर्जेदार अभ्यासक्रम, पाठयपुस्तके तयार करावी लागतील. त्यातील संदर्भ ग्रंथ व आदर्श शिक्षक तयार करावे लागतील. मात्र सध्याचा शिक्षणावरील अल्पसा राष्ट्रीय खर्च पहाता यातील संस्कृतसारख्या अनेक भाषा नष्ट होतील काय? अशी भिती व्यक्त होण्यास पुरेसा वाव आहे. विज्ञान, तंत्रज्ञान, साहित्य, भाषा व कलाकौशल्य यांना समान दर्जा मिळाला तरच व्यवसायाभिमुख परिपक्व युवक तयार होतो. पण संगणकीय कालखंडात हा सारा समतोल ढळला असल्याचे वास्तव पुढे येत आहे. विशेषीकृत एकांगी शिक्षण हे मोठया अज्ञानाचे वाहक असते. हे लक्षात घ्यावे लागेल.

(3) भारताला जागतिक ज्ञान महासत्ता बनविणे :–

कॉंग्रेस राजवटीमध्ये असणा–या संस्था, संघटनांची नावे काढून टाकून त्याला नविन प्रारूप देण्याचे काम सध्या सुरू आहे. जसे मनुष्य बळ विकास मंत्रालयाऐवजी शिक्षण मंत्रालय, युजीसी, एआयसीटीई व राष्ट्रीय शिक्षण प्रशिक्षकाच्या जागी भारत उच्च, शिक्षण आयोग, विद्यापीठांच्या पर्यायी व्यवस्था म्हणून क्लस्टर्ड विद्यापीठे, स्वायत्त कॉलेजेस आणि त्यासाठी 'रूसा' सारख्या केंद्रीय अनुदान संस्था तयार होत आहेत. यातील राजकीय हेतू बाजुला ठेवला तर वाढत्या शैक्षणिक गरजा पूर्ण करण्यास शिक्षणाच्या वाढत्या नव्या

संधी व विकेंद्रीत शिक्षणावर नव्या शैक्षणिक धोरणात भर दिला आहे. यास यश आले तर भारत जागतिक ज्ञान महासत्ता बनेल, असा दावा या धोरणात केलेला आहे. मात्र यातील तथ्यांश शोधणे हे सजग नागरिकाचे कर्तव्य आहे.

मूळात जागतिक कोणतीही महासत्ता हा शब्दच आभासी असून एकविसाव्या शतकात ज्ञानविज्ञान, तंत्रज्ञान, अवकाशशास्त्र, नॅनो तंत्रज्ञान व कोरोना सारख्या विषाणू निर्मितीपासून कृत्रीम ग्रह एवढेच काय पण सूर्य तयार करण्यापर्यंत माणूस विस्तारला आहे. त्यामुळे आपल्याला कोणत्या प्रकारची जागतिक ज्ञान महासत्ता बनायचे आहे याची प्रमाणके ठरवावी लागतील. ही ज्ञान महासत्ता जगाचे व मानवजातीचे प्रश्न सोडवणारी असेल की, ती अखिल मानवजातीचा विध्वंस करणारी असेल, हेही तपासून पहावे लागेल.

खरतर शिक्षण प्रक्रियेत महत्वाचे असणारे तीन टप्पे समजून घेतल्याशिवाय जागतिक ज्ञान महासत्ता या शब्दाचा अर्थ व अवकाश समजणार नाही. या प्रकियेतील पहिला टप्पा म्हणजे ' माहिती प्रसारण व तिचे आकलन ' या टप्प्यात फक्त विविध प्रकारची माहिती दिली जाते. ती वस्तुनिष्ठ असते. त्यामुळे ती साधारणतः पाठ करावी लागते. जसे या राजाचा जन्म, त्या नदीचा उगम, अमूक पर्वताची उंची, इत्यादी. तर दुस–या टप्प्यात ' शिक्षणाचे विविध विषय ' व त्यांची सखोल विषयनिष्ठ माहिती असते. तसेच या माहितीला व्यापक कार्यकारणभाव असून त्यात का? केंव्हा? कुठे? कसे? कोणते? हे प्रश्न अध्यारूत असल्याने वस्तुनिष्ठ माहितीची आकलन क्षमता सखोल बनून ती रूंदावते. या प्रकियेतील तिसरा टप्पा हा 'ज्ञान टप्पा' असून त्यात बौध्दिक विवेकी व मानसिक भावनिक आधार असतात. मिळालेल्या माहितीच्या शिक्षणमर्यादा विस्तारत या ज्ञानटप्प्यात माणूस हा प्रगल्भ व अधिक समतोल बनताना तो शास्त्रीयतेचा स्वीकार करतो व आंतरिक उपजत कलागुणांचा सौंदर्यवादी रसिक नजरेने विकास करतो. ही आदर्श माणूस तयार करणारी, मानवी आदर्श मूल्य जपणारी माणुषीकरणाची अंतीम अवस्था असून ती वैश्विक ज्ञानाशी एकरूप होण्याचा प्रयत्न करते. माहिती व शिक्षणातून माणूस बौध्दिकदृष्टया सक्षम बनत असला तरी त्याला नैतिक, सौंदर्यवादी आणि मानवतावादी बनण्यासाठी ज्ञान टप्प्यात जावे लागते. शिकलेला माणूस भ्रष्टाचारी असू शकतो तर ज्ञान मिळविलेला सद्पुरूष हा सभ्य नागरिक व शिष्टाचारीच असू शकतो. माहिती, शिक्षण व ज्ञान हे या एकंदर शिक्षण प्रक्रियेचे तीन टप्पे असले तरी ते एकमेकाशी संलग्न असतात. तसे ते परस्परावलंबीही असतात. ज्ञानावस्था ही यातली पूर्णावस्था समजली जात असल्यानेच भागवतधर्मीय महाराष्ट्रीयन सहिष्णू परंपरेत मुलांची नावे माहितीश्वर, शिक्षणेश्वर वा शिक्षणदेव अशी ठेवली जात नसून ज्ञानेश्वर, ज्ञानदेव, ज्ञानोबा याच नावातून या अंतीम ज्ञानावस्थेचा गौरव केला जातो.

माहिती, शिक्षण व ज्ञान या संक्रमणावस्था असल्याने त्यांचे हेगेलीयन विवेचन करणे संयुक्तीक ठरते. हेगेल या जर्मन विचारवंताने मानवी विकासाचे तीन टप्पे सांगितले होते. त्याला तो अनुक्रमे वाद, प्रतिवाद व समन्वय म्हणतो. नव्या राष्ट्रीय शिक्षणधोरणाचा विचार करता 'वाद' म्हणजे माहिती संकलन की, जे प्राथमिक शाळेत केले जाते. याला ज्ञानाची तोंडओळख म्हणता येईल. 'प्रतिवाद' म्हणजे या प्राथमिक वस्तुनिष्ठ माहितीची पडताळणी की, जी माध्यमिक शाळेत व उच्च शिक्षणात केली जाते. त्या माहितीची सखोल इतिहास व पूर्वपीठिका समजून घेतली जाते. हेगेलच्या विकासवादात सांगितलेला तिसरा टप्पा म्हणजे 'समन्वय' किंवा 'सुसंवाद' ज्यात वर दिल्याप्रमाणे शिक्षणाला बाहय अनुभव व संशोधनातून अधिक बौध्दिक, मानसिक व नैतिक बनवताना त्या ज्ञानाची आदर्श माणूस निर्मिती, आदर्श नागरसमाज निर्मिती व आदर्श राष्ट्रबांधणीतील उपयोगिता क्रियाशील केली जाते. ग्रीक विचारवंत प्लेटोने त्यांच्या ' दि रिपब्लीक ' ग्रंथात virtue is knowledge असे म्हटले होते. सद्गुणांना तो 'ज्ञान' म्हणतो. ही व्याख्या आपण मान्य केली तर भारत भावी काळात ज्ञानसत्ता बनणार म्हणजे काय? यावर प्रकाश पडतो. या सद्गुणांनी भारत

जर वैश्विक बनवणार असेल तर पहिले दोन टप्पे आपणास मजबूत करावे लागतील, तसेच नागर समाजाचे एकंदर पर्यावरण शिक्षणासाठी पोषक व समतोल करावे लागेल. जे सध्या तरी प्रदूषित आहे.

भारतात कृत्रीम बुध्दिमत्ता व संगणक क्रांतीचा पुरस्कार 1986 मध्ये राजीव गांधींनी केला व खेडयापाडयापर्यंत तंत्रज्ञान पोहोच करून त्यांनी, ग्रामीण समाज, महिला, अनुसूचित जातीजमाती यातील शैक्षणिक विषमता दूर करण्याचा प्रयत्न केला. 1976 मध्ये झालेल्या 42 व्या घटनादुरूस्तीने केलेल्या कॉंग्रेसी विज्ञानवादी समाजवादाचा हा एक भाग होता. याच घटनादुरूस्तीने शिक्षण हा विषय राज्य यादीतून समवर्ती यादीत टाकण्यात आला. यामुळे विशेषतः उच्च शिक्षणाची ध्येय्य धोरणे ठरवण्याचे अधिकार राज्याला असले तरी ते केंद्राला प्रमाण असण्याची नियमावली पुढे आली. भारतीय संघराज्यात केंद्रसरकार शिक्षणक्षेत्रातही अधिक सार्वभौम बनवण्याचा हा प्रयत्न होता. यातून बिगर कॉंग्रेसी घटकराज्यात केंद्रिय शैक्षणिक धोरणाबाबत शंका व्यक्त होऊ लागल्या आणि सध्या महाराष्ट्रात युजीसी, राज्यपालांचे शैक्षणिक अधिकार, कुलगुरू नियुक्त्या व कोवीड काळातील ऑफलाईन, ऑनलाईन शिक्षण आणि परीक्षांच्या निमित्ताने केंद्र व महाराष्ट्र सरकार यांचे वाद शिगेला पोहचले.

1992 मध्ये नरसिंहराव प्रधानमंत्री असताना त्यांनी भारतीय राज्यघटनेच्या मार्गदर्शक तत्वांच्या 4 थ्या भागात 45 व 39 (F) कलमात सर्वांना शिक्षणसंस्थात न्याय्य प्रवेशासाठी राज्याने पुढाकार घेण्याची तरतूद केली. सप्टेंबर 1985 ते जून 1988 या काळात ते भारताचे पहिले मनुष्यबळ विकास मंत्री होते. अनेक भाषांवर प्रभुत्व असणारे ते मौलाना आझादानंतरचे सक्षम शिक्षणमंत्री होते. 1947 पासून भारतात जे जे राष्ट्रीय शिक्षण धोरण राबवले, ते अगदी निर्दोष होते, असे म्हणता येत नाही, पण 1991 च्या जागतिकीकरणाच्या व खाजगीकरणाच्या नव्या आव्हानापर्यंत हे जुने धोरण स्थिर झालेले होते. निरक्षरतेचे व विद्यार्थी गळतीचे मोठे प्रमाण, ही त्या काळातील मोठी आव्हाने होती आणि ती त्यावेळची साधनसुविधा पहाता तशी गुंतागुंतीची आव्हाने होती. विषमतेचा व शैक्षणिक विकेंद्रीकरणाचा प्रश्न त्यावेळच्या कॉंग्रेस सरकारपुढे होता. तरी सुध्दा या सर्वात एक जमेची बाजू होती व ती म्हणजे, आहे ती प्रचलीत शिक्षणपध्दती स्थिर होती व त्यात मोठे सातत्य होते. शिक्षणाच्या तत्वज्ञानात असे म्हणतात की, शिक्षण हे प्रयोगशील असावे पण ते सारखे बदलणारे नसावे. या स्थिरतेने व सातत्याने विद्यापीठ, शाळा कॉलजेसचे शिक्षणप्रशासन हे तेंव्हा प्रश्नांचा स्वीकार करीत विकास पावत होते. असे म्हणतात की, एक सुमार शिक्षक सुध्दा विद्यार्थी काही दिवसाच्या संवयीनंतर स्वीकारतात व त्याची कमतरता स्वाध्यायाने दूर करतात. नाहीतर प्रा. नरहर कुरूंदकर एका भाषणात म्हणाले होते की, ' शिक्षक हा विद्यार्थ्यांच्या पुढे दोन तास असतो.' आदर्श शिक्षक जर दोन तास पुढे असेल तर जरा मध्यम व सुमार शिक्षक काही फार पुढे नसतो. तो फरक विद्यार्थी समजून जादा अभ्यास करतात. नाहीतर विद्यार्थी हा देखिल शिक्षक व शिक्षकही विद्यार्थीच असतो. मात्र या सामान्य शिक्षकाऐवजी नामवंत शिक्षक विद्यार्थ्यांना घडवण्यासाठी सातत्याने बदलले तर त्याची विदवत्ता ही विद्यार्थ्यांना उपयोगाची ठरत नाही. कारण अध्ययन अध्यापनात शिक्षक व विद्यार्थ्याला परस्परांची दुर्बल स्थाने आणि बलस्थाने समजावी लागतात. त्याच अनुबंधातून शासकीय धोरणे व शिक्षणप्रकिया यांचे परस्पर जिव्हाळयाचे संबंध मजबूत असावे लागतात. 1991 पर्यंत बराच स्थिर व रचनात्मक कामात अडकलेल्या सरकार, शिक्षणसंस्था, समाज व विद्यार्थी यांनी अडचणींचा स्वीकार करीत आपले शिक्षणधोरण अधिक परिणामकारी व यशस्वी बनवले. वसंतराव नाईकांचे स्थिर सरकार, मधुकरराव चौधरी सारखा 1957 ते 1978 या काळातला सक्षम गांधीवादी शिक्षणमंत्री व केंद्रातही स्थिर सरकारे व स्थिर शैक्षणिक धोरणांमुळे आपण अडचणीवर मात करू शकलो. ही स्थिरता 1991 नंतर पूर्णतः बदलली आणि व्यापक आंतरराष्ट्रीय प्रश्नांना सामोरे जाण्यासाठी आपणही प्रमाणित खाजगीकरणास समांतर व्यवस्था म्हणून मान्यता दिली. मात्र या दृष्टीने नविन शैक्षणिक राष्ट्रीय धोरण या काळात तयार झाले नाही, ही चिंतेची बाब होती.

नव्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची पूर्वपीठिका :– 1947, 1968, 1986 आणि यानंतर राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात 2020 च्या कायद्याने आमुलाग्र बदल झाले. स्वातंत्र्यानंतर पंच्याहत्तर वर्षाच्या प्रदीर्घ वाटचालीत व 1986 नंतर चौतीस वर्षानी राष्ट्रीय धोरणात बदल होणे अपेक्षीत होते. पण तसे झाले नाही. मात्र या सा–या सुधारणावादी कायद्यांची सुरूवात पं. नेहरूंच्या काळात भारताचे पहिले शिक्षणमंत्री मौलाना आझाद यांनी केली. त्यांनी राष्ट्रीय शैक्षणिक धोरण ठरवताना समान शिक्षण व आधुनिक शिक्षण प्रसारावर भर दिला. त्यासाठी नेमलेल्या मुदलियार आयोग व कोठारी आयोगाने पुढाकार घेऊन शिक्षण प्रसार व गुणवत्तेचा आग्रह धरला. पुढे इंदिरा गांधींनी डॉ. त्रिगुणा सेन यांच्या आयोगा मार्फत राष्ट्रीय एकात्मता, सांस्कृतिक व आर्थिक विकासावर भर देणा–या शिक्षणाला महत्व दिले. एकूण राष्ट्रीय उत्पन्नाच्या 6 टक्के खर्च शिक्षणावर करावा, ही त्यांचीच शिफारस होती. 1968 मध्ये गुजरात विद्यापीठाचे कुलगुरू ईश्वरभाई पटेल समितीची स्थापना झाली. त्या शिफारसीही महत्वपूर्ण होत्या. 1985 मध्ये राजीव गांधींनी जातीजातीतील विषमता दूर करणा–या शिक्षणावर भर देऊन तंत्रज्ञानाला प्राधान्य दिले. तसेच शैक्षणिक प्रवाहाबाहेर पडलेल्या विद्यार्थ्यांसाठी 'इंदिरा गांधी राष्ट्रीय मुक्त विद्यापीठ' स्थापन केले. याच धर्तीवर 1989 मध्ये महाराष्ट्रात नाशिक येथे 'यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ' स्थापन झाले व बहुतेक विद्यापीठात दूरशिक्षण विभागातून शिक्षण प्रसाराच्या नव्या संधी निर्माण करण्यात आल्या. 1992 मध्ये प्रधानमंत्री पी. व्ही. नरसिंहराव यांनी जनार्दन रेड्डी यांच्या अध्यक्षतेखाली राष्ट्रीय शैक्षणिक पुनर्विचार धोरण समिती स्थापन झाली. यातूनच 18 ऑक्टोबर 2001 च्या भारत शासन निर्णयाने जे ई ई, ए आय ई ई, आणि एस एल ई ई या तीन परीक्षा योजना आखल्या गेल्या. 2009 मध्ये मनमोहनसिंग यांनी निरक्षर व नवसाक्षरांसाठी केंद्राची शिक्षण योजना लागू केली. त्यात 12.7 कोटी लोक प्रौढ साक्षर झाले.

हा सर्व अलीकडचा कालखंड मोठा अस्थिरतेचा व सीनिसिझमचा (नैराश्यवादाचा) होता. 1991 च्या जागतिकीकरण, खाजगीकरण व उत्तर आधुनिकीकरणाने जगाबरोबर मानवी संबंधही आमुलाग्र बदलले होते. रशियात 1986 मध्ये गोर्बाचेव्ह यांच्या ग्लासनोस्त व पेरेस्त्रोईका (स्वायतता व पुनर्रचना) धोरणाने तिथे संघराज्याचे विघटन व केंद्रीत लोकशाही सुरू झाली होती. तिथल्या साम्यवादी राष्ट्रीयकरणवादी आर्थिक धोरणाला आणि साम्यवादी साचेबंद पोलादी शिक्षण पध्दतीला लोक कंटाळले होते. वाढते दारिद्रय व रशियाच्या विघटनाने जगाचा समतोल ढळला होता. त्यामुळे सत्तासमतोल व शीतयुध्दाचा शेवट होऊन अमेरिकेचे महत्व वाढत होते. पर्यावरण, महिलांचे प्रश्न, दहशतवाद, बेकारी, मानवी हक्क, दारिद्रय, पोलीओ व एडस निर्मुलन, यासारखे जागतिक प्रश्न शिक्षणातून सोडवता येतील का? याचा सार्क, ब्रिक्स, कॉमनवेल्थ कंट्रीज, युरोपीयन संघ, ओपेक ते यू. एन संघाच्या विविध संधी करारातून व शिखर संमेलनातून विचार होत होता. त्यामुळे शिक्षणाची आधुनिक भूमिका आता निर्णायक ठरणार होती.

या जागतिक संक्रमणकालीन आव्हानांचा भारतावर परिणाम होणे स्वाभाविक होते. यातून कोलमडलेली भारतीय शिक्षणव्यवस्था सावरण्यासाठी आपण बालशिक्षणापासून दुरूस्तीला सुरूवात केली. याचाच एक भाग म्हणजे 86 व्या घटनादुरूस्तीने 2002 मध्ये घटनेच्या कलम 21 ए अन्वये 'शिक्षण' हा प्रत्येक बालकाचा हक्क आहे हे सांगण्यात आले. यातूनच 2009 मध्ये 'राईट टू एज्युकेशन' या कायद्यास भारतीय संसदेने मंजुरी दिली व 1 एप्रिल 2010 रोजी त्याची अंमलबजावणी सुरू झाली. या कायद्याने सहा ते चौदा या वयोगटातील मुलांना सक्तीच्या व मोफत शिक्षणाची तरतूद करण्यात आली. या कायद्या अंतर्गत शिक्षा अभियान, मध्यान्ह भोजन, नवोदय विद्यालये, केंद्रिय विद्यालये यासारख्या सोई करण्यात आल्या. त्यात वंचित घटकांसाठी 25 टक्के आरक्षण ठेवण्यात आले. शिक्षण सुधारणेच्या प्रकियेतला हा महत्वाचा निर्णय होता.

पण अपुरा निधी, नियोजनाचा अभाव आणि वंचीत घटक, भटक्या जातीजमाती, असंघटीत फिरस्ते कामगार, आदिवासी, ऊसतोडीवाले, विटभट्टीवालेकामगार यांच्याकडे उपलब्ध नसणारे मुलांचे दाखले,

जन्मपुरावे यामुळे असा मोठा उपेक्षीत समाज ' राईट टू एज्युकेशन ' या प्रक्रियेत उपेक्षीत राहिला. भारतात कोणतेही सरकार असो. तज्ञ लोकांच्या सल्ल्याने ते कल्याणकारी हेतू डोळयासमोर ठेऊनच कायदे करतात. मात्र एकतर या कायद्यांची योग्य राबवणूक होत नाही. त्यासाठी निधी अपुरा पडतो. ऐनवेळी तांत्रिक, नैसर्गिक अडचणी व संकटांना सामोरे जावे लागते किंवा असे चांगले कायदे आपल्यासाठी आहेत याचीच लाभार्थींना माहिती नसते. आज पंच्याहत्तर वर्षानंतर भारतीय राज्यघटना व मूलभूत अधिकार तथा कर्तव्यांची किती लोकांना माहिती आहे? याचे उत्तर 'फारच थोडे' हेच द्यावे लागेल. राष्ट्रीय उत्पन्नाच्या 6 टक्के खर्च अपेक्षीत असताना तो 3 टक्के च्या वर का होत नाही? शाळेत प्रवेश घेणा–यापैकी 50 टक्के मुले का शिकत नाहीत? 30 टक्के विद्यार्थी इंग्रजी शाळामध्ये शिकतात, मग समान शिक्षण कुठे आहे? यात मातृभाषेतून शिक्षण देण्याचे काय झाले? सेमी इंग्रजी, सीबीसीएस, सेमिस्टर, आठवीपर्यंत परीक्षाच नको असे का? हे योग्य की अयोग्य? मेडिकल प्रवेशाला खाजगी कॉलेजमध्ये दीड कोटी डोनेशन ! हे कशाचे प्रतिक आहे? ऑन लाईन एज्युकेशन की ऑफ लाईन एज्युकेशन योग्य? खाजगी क्लासवाल्यांचे महत्व का वाढते आहे? सध्याचे मेरिट हे खरोखरच मेरिट आहे का? स्पर्धा परीक्षा व्यवस्था, बोर्ड, विद्यापीठे व एकंदर शिक्षण प्रक्रिया पारदर्शी आहे का? असे मूल्यमापन करणारी उच्च शिक्षणातील नॅक सारखी कौन्सिल खरोखरीच कॉलेज, विद्यापीठांचे मूल्यमापन करते का? स्वायत्त व परकीय विद्यापीठे, क्लस्टर्ड विद्यापीठे, केंद्रीय विद्यापीठे, अनुदानित व विनाअनुदानित संस्था कितपत वैध आहेत? असे अनेक प्रश्न या समकाळात तयार होत असले तरी ते शासनदरबारात गेले नाहीत. व गेले तरी ते समाधानकारकरित्या कधी सुटले नाहीत. सर्वच नागरी संस्था संघटनांचे अर्थ व संदर्भ कालौघात बदलल्याने मिळणा–या शिक्षणाचा संबंध ज्ञानाऐवजी नोकरीशी जोडला जात राहिला. स्पर्धा, गुणवत्ता, परीक्षा व गोंधळलेल्या समाजव्यवस्थेतून अस्वस्थ करणारे जीवन सारखे प्रश्न व चिंताच तयार करीत राहिले. या सा–यात खरी अभिजात कर्तबगारी तयार करण्यात शिक्षण अपुरे ठरत गेले.

भारत सरकारचे नवे राष्ट्रीय शैक्षणिक धोरण मूल्यमापन :– भारतातील सर्व राष्ट्रीय शैक्षणिक धोरणांचा आढावा घेऊन नवे शैक्षणिक धोरण तयार करण्यासाठी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी ऑक्टोबर 2016 मध्ये माजी केंद्रीय सचिव टी. एस. आर. सुब्रमण्यम यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमली. त्याची प्राथमिक तयारी मनुष्यबळ विकास मंत्री स्मृती इराणी यांनी 2015 मध्ये केली होती. या समितीच्या शिफारसींना त्यावेळी संसदेची मंजूरी मिळाली नाही. मात्र या समितीने अभ्यासपूर्वक अगोदरच्या कामाचा आढावा घेतला. यात डिस्ट्रीक्ट प्रायमरी एज्युकेशन प्रोग्रॅम, सर्व शिक्षा अभियान 2001, राईट टू एज्युकेशन 2009, नॅशनल प्रोग्रॅम फॉर एज्युकेशन फॉर गर्ल्स ॲट एलिमेंटरी लेवल, राष्ट्रीय माध्यमिक शिक्षा अभियान 2009, माध्यमिक स्तरावर अपंगांसाठी इन्क्लुझिव एज्युकेशन फॉर द डिसेबल्स फॉर सेकंडरी स्टेज, प्रौढ साक्षर भारत, राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियान 2013 इत्यादींचा समावेश होता. याच अभ्यास अहवालाच्या आधारावर इस्त्रोचे अध्यक्ष के. कस्तुरीरंगन व त्यांच्या नऊ सदस्यांनी तयार केलेल्या प्रस्तावास 29 जुलै 2020 मध्ये नवे राष्ट्रीय शैक्षणिक धोरण म्हणून संसदेची मंजूरी मिळाली. यातील महत्वाच्या तरतूदी पुढीलप्रमाणे –

1) सर्वांना शिक्षण, चांगले शिक्षण, समान शिक्षण, आवाक्यातले शिक्षण व उत्तरदायित्वाचे निश्चतीकरण या पंचसूत्रीवर भर देताना या समितीने 12 + 2 या प्रचलीत पध्दतीऐवजी 5 +3 + 3 + 4 अशी प्राथमिक व माध्यमिक शिक्षणाची 15 वर्षे कालावधीत वर्गवारी केली. ती विद्यार्थी वयाच्या 18 पर्यंत असेल.

5 वर्षे	3 पूर्व प्राथमिक + 2 वर्षे पहिली व दुसरी वर्ग	वयोगट 3 ते 8
3 वर्षे	तिसरी ते पाचवी वर्ग	वयोगट 8 ते 11
3 वर्षे	सहावी ते आठवी वर्ग	वयोगट 11 ते 14

4 वर्षे	नववी ते बारावी वर्ग	वयोगट 14 ते 18

या सर्व टप्प्यात विद्यार्थ्यांच्या क्षमतेचा विचार करून बौध्दिक विकास व अध्ययन तत्व आधारीत अभ्यासक्रम व अध्यापनशास्त्र विकसीत केले जाईल. असे म्हटले आहे.

यासाठी प्रधानमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली राष्ट्रीय शिक्षण आयोग काम करेल व तो भारतीय शैक्षणिक दूरदृष्टीचा नियंत्रक, मार्गदर्शक व संचालक असेल अशी अपेक्षा व्यक्त केली आहे. त्याचाच एक भाग म्हणून 2030 पर्यंत पूर्व प्राथमिक शाळा ते माध्यमिक शाळाचे शंभर टक्के पटपुर्तीकरण करण्याचे ध्येय्य गृहित धरले आहे. तसेच दहावी, बारावी बोर्ड परीक्षा अधिक सुटसुटीत वा रद्द करून त्यात विद्यार्थ्यांच्या सारभूत कार्यक्षमतेवर भर दिला जाईल. या नव्या धोरणात मूळ शिक्षणप्रवाह, अवांतर क्रिया उपक्रम व व्यावसायिक प्रवाह यात वेगळेपणा नसेल. या सा–या प्रक्रिया एकसंध असतील. इयत्ता सहावीपासून व्यवसायाभिमुख शिक्षणाची सुरूवात होईल आणि ऐच्छिक भाषेत शिक्षण घेता येईल, असे म्हटले आहे.

हा प्राथमिक व माध्यमिक शिक्षणाचा नवा आराखडा पहाता काही शंका इथे व्यक्त करणे संयुक्तीक वाटते यात –

अ) पूर्व प्राथमिक शिक्षण हे वयोगट तीन पासून सुरू व्हावे असे नव्या धोरणात म्हटले आहे. वास्तविक पहाता सिगमंड फ्रॉईडच्या मानसशास्त्रीय निरिक्षणानुसार हा वयोगट आईवडीलांसोबत घरात राहाण्याचा व खेळण्याचा असतो. या बाल्यावस्थेत शिक्षणाच्या आवश्यकतेपेक्षा घरातील सुरक्षा व प्रेम त्याच्या समतोल वाढीस महत्वाचे असते. पण ब–याचवेळा मुलांना कमी वयोगटात व अल्पकालावधीत खुप काहीतरी शिकवण्याचा आग्रह केला जातो. यातून त्यांच्यात येणारे अकाली प्रौढत्व हे बुध्दीवादी वाटत असले तरी ते एककल्ली व आग्रही असू शकते.

ब) प्राथमिक व माध्यमिक शिक्षण घेताना त्यात विषयांचे वैविध्य असणे स्तुत्य आहे पण क्रमिक अभ्यासाबरोबर त्यात तंत्रज्ञान व व्यवसाय शिक्षण घुसडणे म्हणजे एक प्रकारची बालमजुरी सुरू करण्याला प्रोत्साहन देण्यासारखे आहे. श्रमाधिष्ठीत शिक्षण व व्यवसाय श्रमाधिष्ठीत शिक्षण यातला मूलभूत फरक नव्या धोरणात निसटलेला वाटतो. व्यवसायांची तोंडओळख एवढया मर्यादेत व्यवसाय शिक्षण असावे असे सूचवावे वाटते.

2) शिक्षक कसा असावा? जुलै 2020 मध्ये मंजूर झालेल्या राष्ट्रीय शिक्षण धोरणात 'आत्मनिर्भर ' असा एक शब्द वापरलेला आहे. या शब्दाचा अर्थ स्वतःवर अवलंबलेला म्हणजे स्वावलंबी होय. याचा अर्थ स्वतःच्या गरजा स्वतः पूर्ण करणे होय. दिसायला हा शब्द आदर्श वाटत असला तरी तो आजच्या कालखंडात काही जटील प्रश्न तयार करणारा ठरू शकतो. विशेषतः शिक्षक हा ज्ञानविज्ञान, कला, साहित्य व त्याच्या अध्यापनात आत्मनिर्भर असावा व तो असला पाहिजे. त्यासाठी या धोरणात तो माध्यमिक शाळासाठी पदवीधर व बी.एड. चे प्रशिक्षण घेतलेला असावा. अशी जुनी अपेक्षाच पुन्हा स्वीकारली आहे. ती योग्यच आहे, मात्र यातील त्रुटी पुढील प्रमाणे :–

अ) खाजगीकरण :– 'आत्मनिर्भर' शब्द जर वेतनाशी जोडला तर शिक्षकाचे आर्थिक हाल तर होणार आहेतच शिवाय त्याची अध्यापनाची क्षमताही त्यात नष्ट होणारी आहे. 'आत्मनिर्भरता' हा शब्द स्वायत्त भारत, स्वावलंबी भारत, बलशाली भारत या अर्थाने प्रभावी राष्ट्रवाद तयार करू शकतो. पण तो समूहवादी शब्द व्यक्तीपातळीवर आर्थिकदृष्टिने खाजगीकरणाला पाठिंबा देणारा वाटतो. शिक्षक दुर्बल असेल तर शिक्षण दुर्बल बनते.

ब) प्रमाणित राष्ट्रीयकरण व प्रमाणित खाजगीकरण :– पं. नेहरूंनी आवाडी अधिवेशनात संमिश्र अर्थव्यवस्थेचा स्वीकार करून समाजवादी लोकशाही अर्थव्यवस्था स्वीकारली. त्यामुळे भारतात अवजड व्यवसाय राष्ट्राच्या मालकीचे, दुय्यम व्यवसाय स्वायत्त प्रमंडळाकडे म्हणजे महामंडळाकडे (अर्ध शासकीय) व दैनंदिन कमी शक्तीचे पण आवश्यक व्यवसाय खाजगी व्यवसायवाल्याकडे अशी ही त्रिस्तरीय रचना रास्त स्वरूपाची होती पण शिक्षणासारखा सर्वस्पर्शी, महत्वाचा व राष्ट्र घडवणारा सेवा व्यवसाय आत्मनिर्भर शब्दामुळे ' तुम्ही तुमच्या गरजा तुमच्या पध्दतीने भागवा,'हे ध्वनीत करणारा आहे. नाहीतर विनाअनुदानित शाळामध्ये 'सेल्फ फडींग ' शब्द रूढ होऊन बराच कालावधी लोटला आहे. नॅशनल ॲक्रीडेशन व ॲसेसमेंट करणारी नॅक समितीसुध्दा महाविद्यालये ही कमर्शियल बनवा आणि महाविद्यालयीन प्रॉपर्टीतून स्वतःचा निधी स्वतः उभा करा. असेच सांगते. याचाच एक भाग म्हणजे नॉन सॅलरी बजेट आता शून्य आहे. काटकसर व कमर्शियल नफा मिळवण्याचा विचार काळाच्या संदर्भात योग्य असला तरी शाळा, कॉलेजसना व्यापारी बाजारपेठा बनवणे व त्यातील उत्पन्नावर शिक्षकांना पगार देणे खाजगीकरणाला पुष्ठी देणारे आहे. सध्या अंगणवाडी शिक्षिकांना पुरेसा पगार नाही पण अनावश्यक कामे आहेत. शिक्षक भरती बंद असल्याने अनेक डी. एड्. कॉलेज व बी.एड. कॉलेज बंद पडलीत. सरकारी शाळेत शिक्षक होणे अशक्य बनल्याने तिथली गुणवत्ता संपली आहे व प्रत्येक अधिकृत शाळा महाविद्यालयासमोर कोटयावधींची उलाढाल असणारे क्लासेस तेजीत आहेत. हे खाजगीकरण टाळण्यास योग्य शिक्षकभरती, त्यांची प्रमाणित गुणवत्ता व त्यांचा पगार तथा सेवाशाश्वती असेल तरच आदर्श शिक्षक तयार होतील की, जे राष्ट्रीय शैक्षणिक धोरण व्यवहार्य करतील. आदर्श शिक्षकांना सांभाळणे सध्या आवश्यक आहे. त्यांचा मोठा तुटवडा सध्या गर्दीमध्येही सतत भासतो आहे.

3) उच्च शिक्षणविषयक तरतूदी आणि शिक्षणाचा दर्जा आंतरराष्ट्रीय बनविणे :– प्राथमिक स्तरावर वाचन, भाषाज्ञान, विज्ञान, गणित व लेखन यावर भर देणारे हे राष्ट्रीय शैक्षणिक धोरण उच्च शिक्षणाबरोबर आंतर राष्ट्रीय स्तरापर्यंत विकास पावत जाईल, अशी मोठी अपेक्षा या नव्या धोरणात सांगितली आहे. संशोधनावर विश्वास ठेवणारे हे धोरण पीएच्.डी. आंतर राष्ट्रीय शोधनिंबध, पेटंट, इम्पॅक्ट फॅक्टर इत्यादींना महत्व देते. याचा एक उगीच विलंब करणारा एम.फीलचा टप्पा या धोरणात बंद केला आहे ही खुपच स्वागतार्ह गोष्ट आहे.

पद्वीपर्यंतचे शिक्षण तसेच चार वर्षासाठी कायम ठेऊन ते लवचिक बनवले आहे. त्याचवेळी वैद्यकीय व कायदेशिक्षण अभ्यासकमासाठी अनुकमे नॅशनल मेडीकल कमिशन व बार कौंसिल ऑफ इंडियाचे अधिकार कायम ठेऊन बाकीचे उच्च शिक्षण हे हाय्यर एज्युकेशन कौंसिल ऑफ इंडिया यांना दिलेले आहेत. त्याचवेळी यु.जी.सी. ही या क्षेत्रातील सर्वोच्च संस्था बंद होणार आहे, तर मनुष्यबळ विकास मंत्रालय आता शिक्षण मंत्रालय म्हणून ओळखले जाणार आहे.

या 'हाय्यर एज्युकेशन कौंसिल ऑफ इंडिया' संस्थेचे चार विभाग करण्यात आले आहेत. यात–

1) राष्ट्रीय उच्च शिक्षण नियामक परिषद – नियोजन व धोरण निश्चिती करणे.

2) सर्वसाधारण शैक्षणिक परिषद – सर्वसाधारण धोरणे ठरविणे.

3) वित्तपुरवठा उच्च शिक्षण अनुदान परिषद – अर्थसहाय्य करणे.

4) नॅशनल क्रिडीटी कौंसिल – विविध नेमणूका व धोरणांना मान्यता देणे.

याबरोबरच सर्वसाधारण भाषांचे संवर्धन करण्यासाठी या नव्या धोरणात नॅशनल रिसर्च फाऊंडेशनची ही सोय करण्यात आली आहे. अलीकडच्या काळात भारतात उच्च शिक्षणाचा टक्का वाढत असला तरी गुणवत्तेचा

प्रश्न उपस्थित होत आहे. बोर्ड परीक्षेत शंभर टक्के गुण, ऑन लाईन परीक्षेत कोरोनाकृपेने नव्वद टक्के गुण, त्यातील सामुदायिक कॉप्या, विविध स्पर्धा परीक्षातून झालेले घोटाळे, विद्यापीठातले परीक्षा गोंधळ पहाता खुप पदव्या घेतलेल्या संशोधक विद्यार्थ्याबद्दलच शंका येते. विद्यापीठ परीक्षा कॅपमध्ये पेपर असेसमेंट कसे वेगात पण बेजबाबदारीने होते आणि नेट, सेट पीएच्.डी. प्राप्त संशोधक विद्यार्थी प्राध्यापक पदाच्या मुलाखतीत त्याच्याच विषयात अज्ञानाचे किती दिवे लावतो, हे व्हिडीओ द्वारे लोकांना दाखवले तर आपली उच्च शिक्षणातील गुणवत्ता किती खालावली आहे. याचा अंदाज येऊ शकेल.

सध्या भारतात 40000 कॉलेजेस आहेत. 1800 विद्यापीठे आहेत. 11000 स्वायत्त संस्था आहेत. म्हणजे शिक्षणाचे ब–यापैकी विकेंद्रीकरण झाले आहे पण हे विकेंद्रीकरण निट पहाणी करता भासमान आहे. कारण जिल्हा स्तरावर पंधरा वीस कॉलेज एका जिल्हयाच्या शहरात दाटलेली आहेत पण ती तालुका पातळीवरच्या छोटया शहरात गरजेपेक्षा कमी आहेत. या उच्च शिक्षणात शिक्षण घेणा–यांचे प्रमाण 2018 मध्ये 27% टक्कयाच्या आसपास होते. ते या धोरणात 2035 पर्यंत 50% टक्के म्हणजे दुप्पट करायचे आहे. नॅक ॲक्रिडेशन व असेसमेंटच्या भितीने बहुतेक कॉलेजेस आता चकाचक व वेल फर्निशड झाली आहेत. अत्याधुनिक सोईसवलतींचा व तंत्रज्ञानाचा मोठा वापर तिथे होत आहे. युजीसीचे अनुदान, जिल्हा परिषदेच्या सवलती, रूसाची भरघोस मदत यामुळे महाविद्यालयांमध्ये सध्या भरपूर फंड पडून आहेत पण प्रत्यक्ष शिकणे व शिकवणे मात्र बंद आहे. कोरोना हे अलीकडचे कारण सोडता त्या अगोदरही कॉलेजेस ही शिक्षणप्रक्रियेपासून दूर गेली होती. नॅकच्या मूल्यमापनात आपल्या कॉलेजला चांगली ग्रेड मिळावी, यासाठी मॅनेजमेंट, प्राचार्य व प्राध्यापक कामाला लागल्याने खरी खोटी कागदपत्रे, फोटो गोळा करून आपण खुप उपक्रमशील व समाजशील आहोत हे दाखवण्याच्या नादात प्राध्यापकांचे वाचन लेखन व खरे संशोधन आणि वर्गातील शिकवणे बंद झाले आहे. त्यातच कायम स्वरूपी पात्र शिक्षक व शिक्षकेतर सेवकांची कमतरता, जे आहेत त्यांच्यावरील अशैक्षणिक कामाचा भार अशा अनेक समस्यांनी उच्च शिक्षण ग्रासलेले आहे. अलीकडच्या दहा पंधरा वर्षात पीएच्.डी. पद्वीसाठी जी संशोधने झाली, त्यांचे पुनर्मुल्यांकन करण्याची वेळ आता आली आहे. त्यातील काही संशोधने अपवादात्मक उच्च दर्जाची अभिजात, चिकित्सक, प्रत्यक्ष निरिक्षणावर आधारीत व शास्त्रीय असतील पण बाकीच्या संशोधनाचा हेतू व उपयोग काय? तर हेतू हा पगारवाढीचा व समाजासाठी उपयोग काय? तर शून्य ! तिच गोष्ट मायनर व मेजर रिसर्च प्रोजेक्टची. उच्च शिक्षणावर एवढा मोठा खर्च सरकार करते पण त्याची उपयोगिता खुपच अल्प. यापेक्षा कमी पगारात आदिवासी पाडयात जिल्हा परिषद शिक्षक जे काम करतात, ते काम अस्सल हाडाच्या शिक्षकाचे आणि 'आत्मनिर्भर' शब्दाला न्याय देताना आंतरराष्ट्रीय स्तरावर दखल घेण्यासारखे आहे. वार्की फाऊंडेशन प्राप्त शिक्षक रणजितसिंह डिसले, सोलापूर. हे असेच मोठे उपक्रमशील विद्यार्थीप्रिय शिक्षक आहेत. आदिवासी पाडा हिवाळे ता. त्र्यंबकेश्वर जि. नाशिक येथील केशव गावीत या आदर्श शिक्षकांची शाळा तर कोणत्याही तथाकथित स्मार्ट इंटरनॅशनल शाळेपेक्षा सर्वच बाबतीत श्रेष्ठ आहे. या पाडयात ना कोणती सोय ना कोणी शिकलेले. ना इथे कोरोना ना इथे इंटरनेट सुविधा, नो ऑन लाईन शिक्षण पण ही शाळा म्हणजे निसर्गातले अनेक ज्ञानशाखा व विद्यार्थी घडविणारे विद्यापीठ ! इथली पहिलीतील आदिवासी मुले दोन्ही हातांनी लिहितात. इंग्रजीचे सातवीचे धडे वाचतात आणि सातशे आठशेचे पाढे म्हणतात. हे खरे शिक्षण व ही खरी शाळा आणि हे खरे भारत घडवणारे शिक्षक. विदर्भात फासेपारध्यांच्या मुलांसाठी ' प्रश्न ' नावाची अशीच अदभूत शाळा काम करते. जिथे मुलांचे बहुतेक सर्व आईवडील व्यसनी, मारामा–या रोज, पोलीस छापे कायमचे व एकतर वडील तरी तुरूंगात किंवा आई तरी. अशा ठिकाणी कोणतीच सोय नसताना काम करणारे शिक्षक. हे खरे शिक्षक व याला न्याय मिळाला पाहिजे, पण आपल्याकडे प्रामाणिक काम करणा–याला सर्व प्रकारचे त्रास व एसी मध्ये बसून निरूपयोगी संशोधन करून लाखो रूपये कमवणा–या विद्वानांना सर्व सोई व फायदे !

संसदेपेक्षा ग्रामपंचायत महत्वाची व उच्च शिक्षणापेक्षा पायाभूत प्राथमिक शाळा महत्वाच्या ही संकल्पना जेंव्हा व्यवहारात येईल तेंव्हाच खरी लोकशाही व खरे माणूस तथा देश घडवणारे शिक्षण येईल. यासाठी गाव हे शिक्षणाचे व लोकशाहीचे केंद्र बनले पाहिजे. खरा प्रामाणिक शिक्षक शिक्षणमंत्री झाला पाहिजे. शैक्षणिक धोरणे ठरवताना त्यात प्रत्येक स्तरातील प्रयोगशील शिक्षक घेतले पाहिजेत. त्यासाठी गुणवत्ता, परीक्षा शिक्षण याच्या नव्या व्याख्या बनवाव्या लागतील आणि विज्ञान, कला, तंत्रज्ञान, साहित्य या सा–या ज्ञानप्रवाहात समतोल साधत सद्वर्तनी माणूस व नागरी समाज बनवावा लागेल. तरच आपण शिक्षणक्षेत्रात अपेक्षीत महासत्ता बनू शकू. सरकारची रचनात्मक भूमिका व समाजाची क्रियात्मक भूमिका शिक्षणाची पडझड थांबवू शकेल, असा विश्वास वाटतो.

भारतीय राष्ट्रीय शैक्षणिक धोरणासमोरील समस्या :– शिक्षण ही सर्वस्पर्शी व्यवस्था असल्याने शासन, प्रशासन, केंद्र घटक राज्य संबंध, धोरण ठरवणा–या युजीसी सारख्या सर्वोच्च संस्था, विद्यापीठे, व्यवस्थापक, प्राध्यापक, विद्यार्थी, शिक्षक, पालक, शाळा, कॉलेज, वसतीगृहे अशा सर्व घटकांचा त्याच्याशी संबंध येतो. त्यामुळे राष्ट्रीय शिक्षण धोरणे आदर्श व विद्यार्थी हिताची असली तरी त्यांची राबवणूक होईपर्यंत त्यात स्थानिक बदल, दुरूस्त्या होत राहतात. ज्यातून त्या धोरणाचा मूळ उदात्त गाभा नष्ट होऊ शकतो. अशा काही ठळक संभाव्य समस्यांचा विचार यासंदर्भात करावा लागेल.

1) भारतीय संघराज्य व्यवस्था :– भारत हे भाषावार प्रांतरचनेतून तयार झालेले संघराज्य असून इथे केंद्र सरकार व राज्यसरकारांमध्ये अधिकारांची वाटणी झालली आहे. खंडप्राय व बहुभाषिक विविधता असणा–या देशात कारभाराच्या सोईसाठी विक्रेंद्रीकरण महत्वाचे असते. त्यामुळे भारत हे मजबूत केंद्र असणारे संघराज्य असून त्याला Quasi Federal असेही म्हणतात. उच्च शिक्षण हा विषय समवर्ती यादीतला विषय असल्याने त्यावर केंद्र सरकार कायदे करते व घटक राज्य सरकारही कायदे करते. मात्र असे कायदे करताना केंद्र व घटक राज्यात धोरण विरोधाभास किंवा वाद झाला तर केंद्राचा कायदा अंतीम मानतात.

सध्या केंद्रात भाजपचे सरकार असून बंगाल, महाराष्ट्र यासारख्या घटक राज्यात बिगर भाजप सरकारे आहेत. या परस्पर विरूध्द पक्षीय सत्ता असणा–या केंद्र घटक राज्यातले वाद् व टोकाचे सत्तासंघर्ष सर्वश्रुत आहेत. पक्षीय संकुचित अभिनिवेष, अती संवेदनशील अस्मितांचे राजकारण, व्यापक राष्ट्रहिताकडे दुर्लक्ष, सोईचे तत्वहीन व विकास कार्यक्रम नसणारे राजकारण, संशयाचे घसरलेले संवादी राजकारण, आणि संसदीय सर्व सभ्यता व शिष्टाचार प्रतिष्ठा यांचा अंत यामुळे राष्ट्रवादी, उदात्त, लोकशाही, समाजवादी व पुरोगामी संस्कृतीचे सामाजिक राजकीय अभिसरण व सामाजीकरण कालबाहय झाले आहे. स्वातंत्र्यपूर्व काळात गांधीवादी नैतिक राजकारणाने स्वातंत्र्यवादी, लोकशाही विचारांनी भारलेला समाज तयार केला. उत्तर गांधीवादी पिढीने तात्विक व रचनात्मक राजकारणातून नवभारताची राष्ट्रबांधणी केली. त्यानंतर संक्रमणकाळात तात्विक राजकारण मागे पडले असले तरी विकास कार्यक्रमाधिष्ठित समाजकारणात भारतात अनेक विकास कार्यक्रम पार पडले पण त्यानंतर तत्व व कार्यक्रम नसणारे आत्मकेंद्री, स्वार्थी व भ्रष्ट राजकारण पुढे आले. याचवेळी प्रशासन व नागरी समाज हा त्यांच्या दैनंदिन समस्यांमध्ये अडकला, तरी त्या त्या काळातली युवाविद्यार्थी पिढी ही चौकटी बाहय सामाजिक, राजकीय व सांस्कृतिक पर्यावरणात होणा–या ब–या वाईट संस्कारात कळत नकळत शिकत राहिली. त्यामुळे शिक्षणाचा विकास नेहमीच लिखित राष्ट्रीय शैक्षणिक धोरणावर व अध्ययन अध्यापनावर निर्धारित होत नाही. तर तो समकालीन बाहय संस्कारांनी तयार होतो. सध्याचे शैक्षणिक धोरण काही शंकासह आदर्श असले तरी त्याची यशस्वीता ही केंद्र घटक संबंध, राजकारण व नागरी समाजातील आदर्श मूल्ये यावर अवलंबून असणार आहे. त्यावर सामाजिक पर्यावरणाचे परिणाम होणारच आहेत. कोरोनासारख्या आजाराने तर सारी शिक्षण व्यवस्थाच कोलमोडून पडली आहे.

2) प्रशासकीय अडथळे :– संसदीय लोकशाहीत असे म्हणतात की, प्रस्थापित सरकार लोककल्याणाला डोळयासमोर ठेऊन धोरणे ठरवत असते. त्यामुळे मूळ कायद्याचे ढाचे हे विकासवादीच असतात, मात्र त्या कायद्यातील प्रगमनशीलता, सर्जनशीलता व मूल्यप्रधानता ही प्रशासकीय स्तरीकरणाच्या टप्प्यात नष्ट होत होत, अशा कायद्यांचा लोकांच्या हातात पडताना आत्माच हरवलेला असतो. यात सचिवालयापासून जिल्हा परिषदांपर्यंत सचिव, कुलगुरू, प्राचार्य, प्राध्यापक, शिक्षक सेवक व विविध परीक्षा मंडळे, बोर्ड व त्यांचे सेवक आणि इतर संलग्न प्रशासन जसे वहातूक सेवा, बँका, तहसिलकचे–या, सरकारी दवाखाने, पोष्ट व सहाय्यकारी सेवा (Auxiliary) संस्थांच्या कर्मचा–यांचा समावेश होतो. या सर्व अधिका–यांना व सामान्य सेवकांना कदाचित मूळ शैक्षणिक धोरण पूर्ण माहित नसले तरी त्यांच्या वाटयाला त्यातील जो भाग आलेला आहे. त्या उच्च, माध्यमिक व प्राथमिक शिक्षणाबद्दल किती आस्था व काळजी आहे यावर त्याची योग्यअयोग्य मोडतोड होते. याला परस्पर समन्वय म्हणता येईल. याला सामुदायिक जबाबदारी व राष्ट्रीय कर्तव्य म्हणता येईल. पण हर्बर्ट स्पेन्सरने म्हटल्याप्रमाणे परस्परावलंबी व्यवस्था कधीही एकटया,एकटया बिघडत नाहीत. सेंद्रीय तत्वानुसार एकाचे बिघडणे त्या संपूर्ण व्यवस्थेच्या संभाव्य यशावर पाणी फेरू शकते. लेखाच्या विस्तार भयास्तव यासंदर्भात काही मोजकी उदाहरणे याठिकाणी देणे आवश्यक वाटते.

नव्या शैक्षणिक धोरणांचे भविष्यकालीन यशापयश तपासताना पूर्वसूरीच्या अधिका–यांनी, सेवक, प्राध्यापक व अभ्यासमंडळांनी केलेल्या चूकांचा धोका परत तर होणार नाही ना? याचा वेध घेणे महत्वाचे आहे. शिक्षण हा विषय समवर्ती यादीत असल्याने आणि विशेषतः प्राथमिक व माध्यमिक शिक्षण हे राज्य सरकारच्या अखत्यारीत येत असल्याने या स्तरावर सातत्याने नवनवे प्रयोग होतात. यात मातृभाषेतले शिक्षण, सेमी इंग्रजी शिक्षण, चॉईस बेस एज्युकेशन, परीक्षेचा वार्षिक पॅटर्न, ऐंशी वीस पॅटर्न, सेमिस्टर असे प्रयोग केल्याने त्यात सातत्याचा अभाव तयार होऊन विद्यार्थी, पालक, शिक्षक व सर्वच व्यवस्थापनात गोंधळ तयार होतो. तिच गोष्ट विविध वर्गांना लागू करण्यात आलेल्या विषयांची व त्याच्या अभ्यासक्रमाची अलिकडच्या काळात विद्यापीठ अभ्यासमंडळे, बोर्ड व माध्यमिक अभ्यासमंडळे यांनी विषय व वर्गाचा आणि त्यांच्या अभ्यासक्रमाचा एवढा गोंधळ केला आहे की, या चुकीच्या आग्रहात संस्कृत, पाली, प्राकृत अर्धमागधी, तर्कशास्त्र, संरक्षणशास्त्र, मानसशास्त्र, हे विषय कायमचे अभ्यासक्रम बाहय झाले आहेत. त्या जागी संगणक शास्त्राशी निगडीत विषय आले असून साहित्य, भाषा व कला याकडे सर्वांचेच दुर्लक्ष झाले आहे. तंत्रज्ञानाचा अतिरेकी आग्रह जसा भविष्यात घातक व मानवी परावलंबनास कारण ठरणार आहे तसेच ज्योतिषशास्त्र सारखा ग्रंथप्रामाण्यवादी व अशास्त्रीय विषय सुध्दा पुढच्या पिढयांना घातक ठरणार आहे. अभ्यासक्रमाची नवी मांडणी करताना सध्या सर्व स्तरात जातिय, धार्मिक अस्मिता खुपच उथळ व असमंजस बनवल्या आहेत. उदाहरणार्थ समाजप्रबोधकाची जात, धर्म पाहून, त्याचा पारंपरिक गट बघून त्यांचा इतिहास आणि समाजशास्त्रात समावेश करणे वा न करणे. यात ज्यांचा समावेश झाला त्या थोर सुधारक तत्वज्ञ विचारवंताच्या वास्तविक मर्यादा सांगणेही आता अवघड झाले आहे. अमूक तमूक विचारवंत हा लहानपणी लहान होता. तेंव्हा त्यांनी ग्रंथलेखन केले नाही हे सत्यही त्या सुधारकाचे मठ्ठ अनुयायी मान्य करीत नाहीत. अभ्यासक्रमात अस्मिता हे नवे दुखणे तयार झाले आहे. प्लेटोने त्याच्या रिपब्लीक ग्रंथांत बुध्दी व आत्म्याचा समतोल तयार करणारे शिक्षण सूचवले होते. तो समतोल प्रशासनात हरवलेला आहे. याबरोबर परीक्षामधले घोटाळे, वर्ग, इमारतीच्या अडचणी, अपुरा शिक्षक वर्ग, त्यांच्या होणा–या बदल्या, खाजगीकरण व क्लासेसचे वाढणारे महत्व, कोरोनामुळे बंद पडलेले जनजीवन, अपुरा निधी, करार तत्वावरचे शिक्षक, नोकरभरतीची बंदी, आणि सार्वत्रीक धरसोड यामुळे नवे शैक्षणिक धोरण राबवताना अनेक अडचणी आहेतच. उध्वस्त गावगाडे, स्मार्ट पण बकाल शहरे, ठप्प प्रशासन, सार्वत्रिक भ्रष्टाचार या सा–या गर्दीतून सध्या शिक्षण वाटचाल करीत आहे.

3) परदेशी विद्यापीठांचा मुक्त संचार :– नव्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या राबवणूकीत परदेशी विद्यापीठांचा मुक्त संचार ही एक मोठी अडचण आहे. उत्तर आधुनिकीकरणात शिक्षण व्यवस्था हिच मोठी बाजारपेठ झाल्याने विद्यापीठे ही स्वस्तात मस्त शिक्षण विकणारी दुकाने झाली आहेत. त्यामुळे जाहिरात, प्रसिध्दी, स्पर्धा, मार्केटिंग, नफा व गुंतवणूक ही बाजारपेठीय वैशिष्टये या शैक्षणिक दुकानात दिसू लागली आहेत. शिक्षक हा दुकानदार व विद्यार्थी हा ग्राहक बनला असून गुरू शिष्य परंपरा ही दंतकथा बनली आहे. यातून शाळा विरूध्द शाळा, कॉलेज विरूध्द कॉलेज, विद्यापीठ विरूध्द विद्यापीठ आणि भारतीय विद्यापीठ विरूध्द परदेशी विद्यापीठ अशी स्पर्धा व संघर्ष वाढला आहे. जे ज्ञान व शिक्षण भारतात उपलब्ध नाही, त्यासाठी पुर्वी अनेक भारतीय विद्वान परदेशात शिकले. बरेचजण तिकडे बॅरिस्टर झाले डॉक्टर झाले. हा इतिहास आहे. पण सध्या विद्यार्थी परदेशात का जातात? तर त्याचे कारण स्वस्त शिक्षण. भारतात मेडिकल शिक्षणप्रवेशाला खाजगी मेडीकल कॉलेजमध्ये दीड कोटी रूपये डोनेशन आहे. अशावेळी काही लाखात परदेशात एम.बी.बी.एस. वा अन्य सन्मानाची पदवी मिळत असेल तर विद्यार्थी तिकडे आकर्षित होणारच. थोडक्यात ही स्पर्धा थांबवून भारतीय विद्यापीठांना आंतर राष्ट्रीय दर्जा मिळवून द्यायचा असेल तर गुणवत्ता, कौशल्य याबरोबर स्वस्त शिक्षण देणे काळाची गरज आहे. जगातील कुठल्याही राष्ट्रापेक्षा मोठे ज्ञानभांडार भारतात आहे पण कालौघात त्याचे महत्व आपण एकतर जाणले नाही व त्याची जपणूक केली नाही. भारतात संस्कृतचे मोठे ज्ञानभांडार असून इथे या विषयाची अवस्था अत्यंत मरणासन्न असताना जर्मनीच्या बर्नसारख्या विद्यापीठात व रशियात हा विषय शिकवला जातो. त्यात सखोल संशोधन चालू आहे. अमेरिकेत गांधीवादी विचारांच्या अभ्यासाला अनेक विद्यापीठात महत्वाचे स्थान असून भारतात आता या विचाराकडे थोडे दुर्लक्ष होत आहे. तिच गोष्ट आयुर्वेद व योगाची. तेंव्हा एतद्येशिय अभिजात ज्ञान, तत्वज्ञान, कला, चित्र, शास्त्र, स्थापत्य, साहित्य व संशोधन इथेच वृध्दिंगत करण्यात आले तर बाहेरच्या विद्यापीठांचा भारतातला हस्तक्षेप कमी होईल. अर्थात नव्या राष्ट्रीय भारतीय धोरणात राष्ट्रीय ज्ञानभांडाराचे जतन होणे गरजेचे आहे. याच विषयाचा एक भाग म्हणून दुर्मिळ पुस्तक, दस्तऐवज, शिलालेख, जुनी वृत्तपत्रे व ग्रंथालयाकडेही लक्ष देणे. त्यांचे जतन व संवर्धन करणे महत्वाचे आहे.

4) भारत सरकारचे नवे राष्ट्रीय शैक्षणिक धोरण आणि संघीय प्रभाव :– हे नवे धोरण खाजगीकरण, व्यापारीकरण यांना प्रोत्साहन देणारे असून बहुजन समाज शिकू नये. तो कामगार व मजूर म्हणूनच राहावा अशी व्यवस्था यात केलेली असल्याने नवे शैक्षणिक धोरण विषमता तयार करणारे, समाजवाद व डाव्या विचारांना विरोध करणारे आणि शिक्षणाचे हिंदुत्वीकरण, भगवीकरण करणारे आहे. म्हणून ते भारतीय राज्यघटनेतील धर्मनिरपेक्षता, सामाजिक समता, समाजवाद व समग्र विकासविरोधी आहे. अशी टीका पुरोगामी विचारवंत, अल्पसंख्य सेल आणि स्टुडंट इस्लामिक ऑर्गनायझेशन ऑफ इंडियाचे शाफी म्हणतात. या टीकेचा सम्यक व तटस्थ विचार करणे गरजेचे आहे.

हे नवे धोरण खाजगीकरणाचे समर्थन करणारे आहे,असा पहिला आक्षेप आहे. मूळात 1991 नंतर अमेरिकाच नव्हे तर रशियातसुध्दा प्रमाणित खाजगीकरण आले. कारण राष्ट्रीयकरणाच्या अतिरेकात तिथे साम्यवादी साचेबंद शिक्षणाचा अतिरेक लोकांना आवडला नाही. शेवटी अतिरेकी खाजगीकरण भांडवलशाहीला व अतिरेकी राष्ट्रीयकरण हे विचारांच्या कट्टरपणाला व एकतंत्री पध्दतीना जन्म देते कारण शिक्षण असो वा इतर कोणताही मानव्य विषय. हा आर्थिक आधारावरच गतिमान बनतो. त्यामुळे सध्यातरी फक्त सरकारी शिक्षण देणे व्यवहार्य होणार नाही. प्रमाणित खाजगीकरण हे काळाचे सार्वत्रीक प्रदत्तीकरण आहे, ते घ्यावे लागेल.

या डाव्यांचा दुसरा आक्षेप म्हणजे हे शैक्षणिक धोरण बहुजन समाज विरोधी असून ते मजूर बनवणारे आहे. प्राथमिक शिक्षणात व्यवसायाची तोंड ओळख ही मजूर बनवणारी आहे, एवढी टोकाची चिंता

करण्याचे कारण नाही कारण सत्तरच्या दशकातही प्राथमिक शिक्षण स्तरावर, शेती, बागकाम, सूतकताई व विणकाम हे विषय सातवीच्या परीक्षेसाठी आवश्यक होते. कर्मवीर भाऊराव पाटील यांनी रयत शिक्षण संस्थेच्या माध्यमातून स्वावलंबी शिक्षणाचे ब्रीद विद्यार्थ्यांना देताना ' कमवा व शिका ' ही श्रमावर आधारीत पध्दती वापरली. त्यामुळे कुठे कोण मजूर झाले? श्रम व व्यवसायाचा अतिरेक नको. इतकीच मापक अपेक्षा.

आणि शेवटची शंका म्हणजे हे धोरण भगवीकरण करणारे आहे. शेवटी ज्या प्रकारची विचारधारा स्वीकारून राजकीय पक्ष काम करतात त्याचा थोडाफार परिणाम धोरणांवर होत असतो. भारतीय राज्यघटनेत आपण 'धर्मनिरपेक्ष' शब्दाचा स्वीकार केला असला तरी आणि या देशातले सर्वच पक्ष स्वतःला 'समाजवादी' व 'धर्मनिरपेक्ष' म्हणत असले तरी व्यवहारात भारतात सर्वच पक्ष 'मध्यम धर्मवादी' आहेत. जे. एन. यू. विद्यापीठ दिल्ली येथील भारतीय राजकारणाचे जेष्ठ अभ्यासक प्रा. रजनी कोठारी यांनी त्यांच्या ' Caste system in India ' या ग्रंथात एक चिंतनशील विचार मांडला होता. ते म्हणतात, "जर तुम्हाला भारतीय राजकारणाचा अभ्यास करावयाचा असेल तर तुम्हाला पहिल्यांदा या देशातील धर्म व जातींचा अभ्यास करावा लागेल" या विधानातील गर्भितार्थ लक्षात घेता सत्तेच्या राजकारणात निरपेक्ष भूमिका टिकत नाही. त्यामुळे इथले डावे उजवे सर्वच पक्ष ' मध्यम धर्मवादी 'आहेत. हे मान्य करावे लागते. आणिबाणीनंतर तयार झालेल्या जनता पक्षात हिंदुत्ववादी जनसंघ व निधर्मी मार्क्सवादी एकत्र का आले? याचे सैधांतिक उत्तर देता न येणे म्हणजे 'मध्यम धर्मवादास' होकार देण्यासारखे आहे. भारतातील सर्व भौतिक व आधिभौतिक घटकात धर्म भरून उरला असल्याने अशी शंका येऊ शकते. ' सेंटेनरी परस्पेक्टीव्ह ऑफ इंडियन नॅशनल कॉंग्रेस' या ग्रंथात प्रा. राम जोशींनी सर सय्यद अहमद या कॉंग्रेस नेत्याचे एक मत मांडलेले आहे. अहमद हे कॉंग्रेसला हिंदू, भावी संसदेला हिंदू या देशातील बहुमताला हिंदू, इथल्या कायदयाला हिंदू मानत होते. म्हणून राष्ट्रीय कॉंग्रेस स्वातंत्र्यवादी व राष्ट्रवादी असली तरी ती हिंदूची असल्याने मुस्लीमांनी सावध राहावे, असा ते सल्ला देत. त्यामुळे या सा–या शंका जुन्याच आहेत.

या सा–या विवेचनातून नव्या शैक्षणिक धोरणात फारच भडक धर्मवादी विचार अभ्यासक्रमात, व शाळा, विद्यापीठात आलेच तर विरोधीपक्ष व सजग नागरी समाज त्याविरूध्द आवाज उठवतील. त्यासाठी संसदेची सोय आहे. जागृक पत्रकारिता आहे. त्यामुळे सरकारला असे भगवीकरण करता येणार नाही. शेवटी धोरण जरी महत्वाचे असले तरी राबवणूक करणारे प्रशासन, शाळा, विद्यापीठे, शिक्षक, विद्यार्थी व पालक यांच्या संयुक्त प्रामाणिकपणावर या शैक्षणिक धोरणाचे यशापयश ठरणार आहे. म्हणून भविष्यकाळात इथे भगवे शिक्षण येणार नाही, ना इथे हिरवे वा निळे शिक्षण येणार. काळाची पाऊले ओळखून इथे स्वच्छ पारदर्शी व माणसाच्या सर्वांगीण प्रगती आणि आनंदाला व्यावहारिक रूप देणारे शिक्षण येणार, असे म्हणायला काय हरकत आहे? शेवटी या नव्या शैक्षणिक धोरणावर विश्वास तर टाकावाच लागेल.